पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय ,भोसरी-३९.
जा.क्र.इक्षेका/ स्विस/१५ /२०२१
दिनांक - २५ /०२/२०२१

**प्रति,**
**मा----------------------------.**

सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय -पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित केलेबाबत.**

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे मार्च २०२१ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा इ क्षेत्रिय कार्यालयातील “संत ज्ञानेश्वर महाराज” सभागृहात आयोजित करणेत आली आहे .सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
(नाना मोरे)
प्रशासन अधिकारी तथा
सचिव) सभाशाखा(
इ प्रभाग समिती

प्रत - १ .सर्व संबंधित शाखाप्रमुख
२ .कार्यालयीन नोटीस बोर्ड

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## इ प्रभाग समिति
## कार्यपत्रिका क्रमांक – १७

**दिनांक - ०५/०३/२०२१ रोजी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे मार्च २०२१ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा वाजता इ क्षेत्रिय कार्यालयातील “संत ज्ञानेश्वर महाराज” सभागृहात आयोजित करणेत आली आहे .सभेत खालील प्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक ०५/०२/२०२१ रोजी तहकुब करणेत आलेल्या व दिनांक १६/०२/२०२१ रोजी घेणेत आलेल्या माहे फुब्रुवारी २०२१ चे मासिक सभेचा सभवृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१५) कायम करणे.

ब) दिनांक १६/०२/२०२१ रोजी घेणेत आलेल्या अंदाजपत्रकाचे सभेचा सभवृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१६) कायम करणे.

**विषय क्र.१.-** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय ,भोसरी करीता महाराष्ट्र शासनाचा “ब” दर्जा प्राप्त असुन त्यांना अनुदान प्राप्त होत असल्याने दर वर्षी पुस्तके/ग्रंथ ,खरेदी करणे आवश्यक आहे .वाचकांच्या व सभासदांच्या आवडीनुसार कथा ,कादंब-या ,ललित,ऐतिहासिक , विनोदी ,आरोग्य ,काव्य ,धार्मिक ,विषयाच्या २०७ पुस्तकांची “इ” क्षेत्रीय कार्यालया मार्फत श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय ,करीता पुस्तक खरेदीकामी कोटेशन नोटीस क्र .१ जा.क्र.भैसावा/कावि/०८/२१ , दि.२९/०१/२०२१ अन्वये प्रसिध्द करून दरपत्रक मागविले असता खालील ४ पुरवठा धारकांकडुन कोटेशन प्राप्त झाले असून ते दिनांक १०/०२/२०२१ रोजी सकाळी सदरची सर्व कोटेशन उघडण्यात आले असता खालील दर दिसून आले आहेत.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | शॉप ऍक्ट लायसन्स | पॅन कार्ड | जी.एस.टी . रजि. | आयकर रिटर्न | दिलेली सुट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | करण बुक सर्व्हिस ,पुणे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ६ % |
| २ | कुणाल एजन्सी ,पुणे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ८ % |
| ३ | कल्पना बुक डीलर्स,पुणे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | १२ % |
| ४ | शुभम साहित्य, पुणे, | ✓ | ✓ | ✓ | ✓ | १५ % |

वरिल तक्त्याचा विचार करता शुभम साहित्य ,अप्पा बळवंत चौक ,पुणे ,यांनी १५ % सुट दिल्याने इकडील दिनांक १२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अजून किती सुट देऊ शकता असे कळविले असता शुभम

साहित्य ,अप्पा बळवंत चौक ,पुणे ,यांनी पुस्तकाचे छापिल किमतीवर जास्तीत जास्त २१ % सुट देण्याचे मान्य केले आहे .त्यानुसार वरील तक्त्यातील पुरवठाधारका पैकी शुभम साहित्य ,अप्पा बळवंत चौक ,पुणे , यांचेकडुन जास्तीत जास्त २१ % सुट मिळाल्याने अटी व शर्ती नुसार श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय ,भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालयाकरिता २०७ पुस्तके थेट पध्दतीने खरेदी करणे कामी अंदाजे ५६,००० -/इतका खरेदी खर्च अपेक्षित आहे .सदरचा खर्च " पुस्तके व नियतकालिके खरेदी " या लेखाशिर्षातून अदा करण्यात येणार आहेत.

शुभम साहित्य ,अप्पा बळवंत चौक ,पुणे ,यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय ,भोसरी करीता २०७ पुस्तके थेट पध्दतीने खरेदी करणे कामी अंदाजे ५६,००० -/ अक्षरी र.रु .छपन्न हजार फक्त (च्या एकूण किमतीवर २१ % सुट देवून प्रत्यक्ष येणा-या किमतीची पुस्तके खरेदीसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

या शिवाय मा. सभापती यांचे परवानगीने सभा कामकाजात घेणेत येणारे ऐनवेळचे विषय.

सही/-<br>
प्रशासन अधिकारी तथा<br>
सचिव) सभाशाखा(<br>
इ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
इ क्षेत्रिय कार्यालय ,भोसरी-३९<br>
जा.क्र.इक्षेका/स्विस/ १५ /२०२१<br>
दिनांक : २५ /०२/२०२१